मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्वच्छ शहर जोडी उपक्रमात महापालिका ठरली मार्गदर्शक

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्गदर्शक शहरांमध्ये झाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या "स्वच्छ शहर जोडी (SSJ) उपक्रमात" पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या मार्गदर्शक शहरांमध्ये झाली आहे. या यशस्वी निवडीमुळे पिंपरी चिंचवड महापालिका आता लहान शहरांसाठी आदर्श ठरणार आहे.

या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या शहरांना, उत्तम कामगिरी करण्यासाठी काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिका पुढील पाच नगरपरिषद व नगरपंचायतींना मार्गदर्शन करणार आहे.



सुरगाणा नगरपंचायत (जि. नाशिक)लांखादूर नगरपंचायत (जि. भंडारा)मंचर नगरपंचायत (जि. पुणे)जामखेड नगरपरिषद (जि. अहिल्यानगर) आळंदी नगरपरिषद (जि. पुणे) या संदर्भातील सामंजस्य कराराचा कार्यक्रम ऑटो क्लस्टर, पिंपरी येथे पार पडला. केंद्रीय मंत्री मा. मोहनलाल खट्टर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीत हा करार झाला. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी करारावर स्वाक्षरी केली.

कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख व उप आयुक्त सचिन पवार यांच्यासह संबंधित नगरपरिषदांचे मुख्याधिकारी महादेव खांडेकर (आळंदी), अजय साळवे (जामखेड), गोविंद जाधव (मंचर), सचिन कुमार पटेल (सुरगाणा) आदी मान्यवर उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांनी या नगरपरिषदांच्या घनकचरा व्यवस्थापन, कचरा विलगीकरण, संकलन व प्रक्रिया प्रणालींचा सविस्तर आढावा घेतला. या संदर्भात ते म्हणाले "पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सर्व नगरपरिषदांना स्वच्छता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी साध्य करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करेल अनुभव, तंत्रज्ञान व व्यवस्थापन पद्धतींचा लाभ या संस्थांना दिला जाईल." आरोग्य विभाग प्रमुख सचिन पवार यांनी देखील महापालिकेच्या यशस्वी प्रकल्पांची माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, "या नगरपरिषदांच्या कामगिरीत सातत्याने वाढ होण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा, मार्गदर्शन आणि सहकार्य वेळोवेळी केले जाईल."

स्वच्छ भारत मोहिमेच्या पुढील टप्प्यात पिंपरी चिंचवड महापालिकेने फक्त स्वतःच्या शहरापुरती मर्यादा न ठेवता इतर शहरांना सक्षम करण्याचा पुढाकार घेतला आहे. यामुळे स्वच्छतेच्या दिशेने एकात्मिक आणि सामूहिक प्रगती घडून येणार आहे.

---

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत मनुष्यबळावर मोठा खर्च

## आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर 29 टक्के खर्च; कंत्राटी व मानधनावरील कर्मचाऱ्यांवरही मोठा खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून भरमसाट खर्चाच्या कामांना प्राधान्य दिले जात आहे. मोठ्या कामासाठी बँक कर्ज तसेच, म्युन्सिपल बॉण्डद्वारे कर्ज उभारले जात आहे. दुसरीकडे, महापालिका आस्थापनेवरील तसेच, कंत्राटी व मानधनावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील वेतन तसेच, पगाराचा खर्च एकूण उत्पन्नाच्या निम्म्यावर पोचला आहे.

वर्षाच्या एकूण उत्पन्नातून आस्थापनेवर 32 टक्केपेक्षा अधिक खर्च होणार नाही, असा आकृतीबंध असावा म्हणजे ममुष्यबळाच्या वेतनावर खर्च केला जावा, असा राज्य शासनाचा नियम आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत आस्थापनेवरील म्हणजे कायमस्वरुपी पदावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या सहा हजार 500 इतकी आहे. आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनावर वर्षाला एकूण उत्पन्नाच्या तब्बल 29 टक्के इतका खर्च होत आहे.



आस्थापनेवरील तसेच, कंत्राटी व मानधनावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर महापालिका दरवर्षी मोठा खर्च करते. हा खर्च महापालिकेच्या एकूण उत्पन्नाच्या निम्म्यापर्यंत पोहचला आहे. वेतन, पगार व मानधनावर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

उत्पन्नाचा तब्बल अर्धा हिस्सा थेट मनुष्यबळावर खर्च होत असल्याने विकासकामे, योजना, प्रकल्प व इतर कामांसाठी निधीची चणचण जाणवत आहे, असे महापालिकेचे अधिकारी खासगीत सांगत आहेत. भविष्यात हा प्रश्न अधिक गंभीर होत जाणार आहे. परिणामी, खर्चिक कामांसाठी कर्ज काढणे, म्युन्सिपल बॉण्ड व ग्रीन बॉण्डद्वारे कर्ज उभारण्यावर महापालिका प्रशासनाकडून भर दिला असल्याचे दिसत आहे.

# ऐन पावसाळ्यात चऱ्होलीच्या मुख्य रस्त्यावर खोदकाम

## विमानतळ मार्गावर वारंवार होतेय रस्ता खोदाई यामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा त्रास

**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली फाटा ते विमानतळ मार्गाचे काम साधारण आठ महिने झाले सुरू आहे. भर उन्हाळ्यात सुरू झालेले काम अद्याप पूर्ण झाले नाही. चऱ्होलीमध्ये मागील चार महिन्यांपासून सातत्याने पाऊस सुरू आहे. भर पावसाळ्यात तयार केलेला हा रस्ता विविध कामांसाठी सातत्याने खोदला जात आहे. यामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

चऱ्होलीचा मुख्य रस्ता म्हणजे चऱ्होली परिसरासाठी जीवनदायीनी आहे. चऱ्होलीच्या आजूबाजूला जो सर्व औद्योगिक परिसर आहे त्या औद्योगिक परिसरातून येणारी सर्व अवजड वाहने याच रस्त्याने येजा करतात

पुणे-नाशिक रोडवरून येणारी औद्योगिक वाहतूक अलंकापुरम मार्गे छत्रपती संभाजी महाराज चौकातून याच रस्त्यावर येते. फुलगाव, मरकळ, धानोरे औद्योगिक क्षेत्रातून येणारी वाहने देखील चऱ्होलीच्या पुलावरून दाभाडे चौक मार्गे याच रस्त्याने प्रवास करतात.

यावर्षी पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे आणि मे महिन्यापासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे संपूर्ण एअरपोर्ट रोडवर खड्डयांचे सामाज्य पसरले आहे. अशातच आता महापालिकेने खोदकाम करून ठेवल्यामुळे मुख्य रस्त्यावर मोठा खड्डा खोदला आहे. दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणावर खड्डे असल्यामुळे वाहतुकीचा पूर्ण खोळंबा झाला आहे.

15 सप्टेंबरपासूनच परतीच्या मान्सूनला सुरुवातदेखील झाली आहे. म्हणजेच थोड्या दिवसात मान्सून महाराष्ट्राच्या बाहेर जाणार आहे. मग, अजून थोड्या दिवसांनी पाऊस उघडल्यावर जर महापालिकेने रस्त्याच्या कामाला सुरुवात केली असती तर चालले नसते का? ऐन पावसाळ्यात एवढी घाई कशासाठी, असा प्रश्न चऱ्होलीकरांच्या मनात निर्माण झाला आहे. भर उन्हाळ्यात सुरू झालेले काम अद्याप पूर्ण झाले नाही. चऱ्होलीमध्ये मागील चार महिन्यांपासून सातत्याने पाऊस सुरू आहे. चऱ्होलीचा मुख्य रस्ता म्हणजे चऱ्होली परिसरासाठी जीवनदायीनी आहे. चऱ्होलीच्या आजूबाजूला जो सर्व औद्योगिक परिसर आहे भर पावसाळ्यात तयार केलेला हा रस्ता विविध कामांसाठी सातत्याने खोदला जात आहे. यामुळे वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.



### एवढी घाई कशासाठी?

» यंदा मान्सून लवकरच देशाबाहेर जाणार आहे, असे हवामान खात्याने सांगितले आहे. 15 सप्टेंबरपासूनच परतीच्या मान्सूनला सुरुवातदेखील झाली आहे. म्हणजेच थोड्या दिवसात मान्सून महाराष्ट्राच्या बाहेर जाणार आहे. मग, अजून थोड्या दिवसांनी पाऊस उघडल्यावर जर महापालिकेने रस्त्याच्या कामाला सुरुवात केली असती तर चालले नसते का? ऐन पावसाळ्यात एवढी घाई कशासाठी, असा प्रश्न चऱ्होलीकरांच्या मनात निर्माण झाला आहे.

### वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक त्रस्त

» विद्यार्थी, भाजीविक्रेते इतर सर्व प्रकारचे व्यावसायिक आणि नोकरदार यांना रोज याच रस्त्याने प्रवास करावा लागतो. पण महापालिकेने ऐन पावसाळ्यात या मुख्य रस्त्यावरच खोदकाम करून ठेवल्यामुळे सर्वांनाच वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. सर्वांना इच्छित स्थळी पोहोचण्यास उशीर होत आहे.

“ महापालिकेने जनतेचा विचार करून पावसाळा थांबेपर्यंत तरी रस्त्याचे काम काढण्याची गरज नव्हती. आधीच रस्त्यांवर मोठे खड्डे पडले आहेत आणि त्यात अजून महापालिकेने रस्ता खोदून ठेवल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. चऱ्होलीतील सामान्य नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे.

- सचिन तापकीर, कोषाध्यक्ष, भाजपा.

# मोरवाडी चौकातील आयलॅण्ड रुंदीकरणाला विरोध; वाहतूक कोंडी वाढण्याची भीती

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने आयलॅण्ड व दुभाजकाची रुंदी वाढविली; भाजपचे अनिकेत शेलार म्हणतात, उपाययोजना तातडीने हवी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोरवाडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात (मोरवाडी-फिनोलेक्स चौक) वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. आता, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने त्या चौकातील आयलॅण्ड व दुभाजकाची रुंदी वाढविण्यात येत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होईल, असा आरोप केला जात आहे. तर, त्यामुळे वाहतूक रहदारी सुरळीत होण्यास मदत होईल, असा दावा महापालिकेकडून करण्यात येत आहे

मोरवाडी चौकात महापालिकेने लाल घोड्याची प्रतिकृती उभारली आहे. तसेच, सुशोभिकरणासाठी आयलॅण्ड उभारले आहेत. त्या चौकात पिंपरी मेट्रो स्टेशन आहे. त्यामुळे या चौकात वाहतूक वर्दळ वाढली आहे. सिग्नल यंत्रणा अयोग्य असल्याने येथे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यात रिक्षा व कॅब चालकांकडून बेशिस्तपणे वाहने पार्क केली जातात. तसेच, मेट्रोचे प्रवासी पदपथावर कश्याही प्रकारे वाहने लावून गायब होतात. तसेच, एका कपड्यांच्या दुकानांमुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. येथील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत महापालिकेकडे अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत.



त्याची दखल घेऊन महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने चौकातील दुभाजक व आयलॅण्डची रुंदी वाढविली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडेल, अशी तक्रर भाजपाचे अनिकेत शेलार यांनी केली आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या संदर्भात शहरी दळणवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले की, मोरवाडी चौकातील दुभाजक व आयलॅण्डची रुंदी वाढविण्यात येत आहे. त्यामुळे ये-जा करणारी वाहने त्याच मार्गातून वळण घेतील. त्यांना इतर मार्गात घुसखोरी करता येणार नाही. तसेच, आवश्यक उपाययोजना व सुशोभिकरण करण्यात येत आहे. सध्या पिंपरी चौकाहून चिंचवडच्या दिशेने जाणारा बीआरटीएस मार्ग तात्पुरता बंद आहे. त्या मार्गावरील बीआरटीचा सिग्नल तात्पुरता बंद केला जाणार आहे.

# देशातील सर्वोत्तम! प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनात पुणे अव्वल

## केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनावर करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात पुणे शहर सर्वोत्तम ठरले

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनावर करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात पुणे शहर सर्वोत्तम ठरले आहे. देशातील विजयवाडा, शिलाँग, भोपाळ, कलकत्ता, वडोदरा, लखनऊ, पुणे आणि मैसूर या आठ शहरांच्या प्लॅस्टिक कचरा प्रक्रियांवर करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात पुणे अव्वल ठरले आहे. मंडळाच्या आकडेवारीनुसार या आठ शहरांपैकी पुणे हे एकमेव असे शहर आहे, जिथे निर्माण होणाऱ्या कचऱ्यातून प्लॅस्टिक विलगीकरणाचे प्रमाण ९८ ते ९९ टक्के आहे. सरासरी पाहिली असता पुण्यातील संकलन आणि विल्हेवाट केंद्रांत येणाऱ्या एक किलो कचऱ्यामध्ये फक्त ७१ ग्राम प्लॅस्टिक आढळते.

देशाच्या लोकसंख्येसह शहरीकरण वेगाने वाढत आहे. त्यामुळे प्लॅस्टिकचा वापरही वाढत आहे. प्लॅस्टिकचे अनेक फायदे असले, तरी त्याचे जैवविघटन न होणारे स्वरूप आणि खराब कचरा व्यवस्थापन प्रणालीमुळे प्लॅस्टिक अनेकदा महापालिकेच्या घनकचऱ्याचा एक प्रमुख घटक बनते आणि शहरातील कचरा डेपोंमध्ये त्यांचे प्रमाण वाढते. यात फक्त एकदा वापरले जाणारे प्लॅस्टिक मोठे आव्हान निर्माण करत आहे. कचऱ्याच्या उगमस्थानावर अप्रभावी विलगीकरण झाल्याने हे प्लॅस्टिक शेवटी लँडफिलमध्ये जातो आणि त्यामुळे पर्यावरणीय हानी होते. हे टाळता यावे म्हणून कचरा संकलनावेळीच त्याचे विलगीकरण होणे अत्यावश्यक आहे आणि केंद्र सरकारकडून त्यासंबंधीचे निर्देशही देण्यात आले आहेत.



### शहरातील प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट

**» शहरातील प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट करण्यात पुणे महापालिकेने 99 टक्के यश मिळवले आहे, तर विजयवाडा 66 टक्के, भोपाळ 59 टक्के, शिलाँग 21टक्के आणि कोलकाता फक्त 9 टक्के प्लास्टिक विल्हेवाट करण्यात यशस्वी झाला आहे.**

### पुण्याची देशात आघाडी

**» या केंद्रांवर जमा होणाऱ्या घनकचऱ्यातून प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण, एकल-वापर प्लास्टिकच्या वस्तू आणि त्यांचे वर्गीकरण याचे सखोल मूल्यांकन करण्यात आले. पुण्यातील औंध, घोले रस्ता कचरा संकलन केंद्र, हडपसर आणि उरुळी देवाची कचरा डेपो या केंद्रांचा अभ्यास केला गेला. आठ दिवसांच्या दररोज पाहणीत एकूण 5,696 किलो प्लास्टिक कचऱ्याचे नमुने गोळा करण्यात आले. या नमुन्यांचे वर्गीकरण केले गेले तसेच कचऱ्याच्या विल्हेवाटीवरून 1,263 किलो नमुने घेतले गेले. मिळालेली निरीक्षणे अहवालात सविस्तर नोंदवली आहेत. पुण्याने 98 ते 99 टक्के गुण मिळवले आहेत.**

मात्र, सर्व महापालिका या कचरा विलगीकरणात तितक्या यशस्वी ठरताना दिसत नाही. त्यामुळे केंद्र सरकारकडून वेळोवेळी याचे मूल्यांकन केले जाते. त्यानुसार मंडळाकडून हे सर्वेक्षण करण्यात आले. त्यासाठी पुण्यातील कचरा संकलन केंद्रापासून ५६९६ किलो, तर विल्हेवाट केंद्रातून १२६३ किलो कचऱ्याचे नमुने तपासण्यात आले. संकलन केंद्रापासून घेतलेल्या कचऱ्यात ४०८ किलो प्लॅस्टिक कचरा निघला, तर पुण्यात निर्माण होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी जो प्लॅस्टिक कचरा काढला जातो, त्यापैकी ९८ ते ९९ टक्के प्लॅस्टिक कचरा पुनर्वापराच्या लायकीचा असतो. सर्वेक्षणात पुण्याच्या कचरा संकलन आणि विलगीकरण प्रक्रियेचे कौतुक करण्यात आले आहे.

शेवटच्या टप्प्यात कचरा डेपोत जाणाऱ्या कचऱ्यातील प्लास्टिकचे प्रमाण कमी करण्यात पुणे महापालिकेने आघाडी मिळवली आहे. त्याउलट, कोलकता आणि शिलाँगमध्ये प्लास्टिक कचऱ्याबाबत उदासीनता दिसून आली आहे. प्रशासकीय पातळीवर ओला आणि सुक्या कचऱ्याबाबत सातत्याने केलेली जनजागृती, बंदी असलेल्या प्लास्टिकच्या वस्तूंचा वापर टाळण्यासाठी राबविलेले उपक्रम आणि या वस्तू विकणाऱ्यांवर होत असलेले कारवाईमुळे प्लास्टिकच्या वापरात घट दिसून येत आहे.

# पीएमआरडीएचा प्रारूप विकास आराखडा अखेर रद्द

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) प्रारूप विकास आराखडा (डीपी) अखेर रद्द करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) सहा हजार चौरस किलोमीटर परिसराचा प्रारूप विकास आराखडा (ड्राफ्ट डेव्हलमेंट प्लॅन- डीपी) रद्द करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. प्रारूप विकास आराखडा रद्द करण्यात येत असल्याचे राजपत्रात जाहीर करावे, असे पत्र 'पीएमआरडीए'ने येरवडा येथील शासकीय मुद्रणालयाकडे दिले आहे.

आता नव्याने प्रारूप विकास आराखडा केला जाणार, की स्ट्रक्चरल प्लॅन राबविला जाणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. 'राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल,' असे 'पीएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहर आणि आसपासच्या परिसरासाठी सन २०१७ मध्ये संपूर्ण हद्दीचा विकास आराखडा करण्यासाठीचा इरादा जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर २ ऑगस्ट २०२१ रोजी प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला. त्यावरील हरकती-सूचनांवरील सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम आराखडा प्रसिद्ध होण्यापूर्वी आराखड्याच्या प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदविण्यात आले. त्या विरोधात उच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर गेल्या आठ वर्षांपासून आराखडा प्रतीक्षेत होता.



आराखड्याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाल्याने एप्रिल महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रारूप डीपी रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. तशी सूचनाही त्यांनी 'पीएमआरडीए'ला केली होती. प्रारूप आराखडा रद्द करण्यात येणार असल्याची माहिती उच्च न्यायालयाला द्यावी, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले होते.

'पीएमआरडीए'ने प्रस्तावित प्रारूप विकास आराखडा रद्द करण्यात येत असल्याचे राजपत्रात जाहीर करावे, असे पत्र येरवडा येथील शासकीय मुद्रणालयाला दिले आहे. 'पीएमआरडीए'मधील वरिष्ठ सूत्रांकडूनही या पत्रव्यवहाराला दुजोरा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रारूप डीपी रद्द होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, प्रारूप डीपी रद्द झाल्यामुळे आराखडा नव्याने होणार का, याबाबत संदिग्धता आहे. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे 'पीएमआरडीए'च्या अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'पीएमआरडीए'च्या हद्दीत डीपीऐवजी टीपी स्कीम (नगररचना योजना) राबविण्याचे संकेत दिले होते.'पीएमआरडीए'ची हद्द ही नवे पुणे आहे. त्यामुळे नव्या पुण्याचा विचार करून बारा मीटर रुंदीच्या रस्त्यांचे जाळे करण्याची आणि त्यानंतर नगररचना योजना (टीपी स्कीम) राबविण्याची सूचना प्रशासनाला करण्यात आली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले होते. हद्दीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्ट्रक्चरल प्लॅनही 'पीएमआरडीए'कडून केला जाणार आहे.

# बिबट्यांच्या वाढत्या संख्येने जुन्नरमध्ये 'मानवी अस्तित्वाचा' धोका

## नागरिकांकडून आता प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन कठोर उपाययोजना करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुका आणि परिसर गेल्या काही वर्षांपासून बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे दहशतीत आहे. सातत्याने होणारे हे हल्ले आणि बिबट्या मादी एकाच वेळी ४ ते ५ पिलांना जन्म देत असल्याने या भागात बिबट्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे. ज्यामुळे येथील मानवी वस्तीचे भवितव्य धोक्यात आले आहे. नागरिकांकडून आता प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या वाढत्या हल्ल्यांमागे बिबट्यांची वाढलेली संख्या हे प्रमुख कारण आहे. स्थानिक नागरिक आणि तज्ज्ञांच्या मते, बिबट्याची मादी एका वेळेस ४ ते ५ पिलांना जन्म देत असल्याने त्यांच्या संख्येमध्ये वेगाने वाढ होत आहे. बिबट्यांना लपण्यासाठी ऊसासारखी पिके आणि शहरातून सहज उपलब्ध होणारे भक्ष्य (उदा. पाळीव प्राणी) यामुळे त्यांना सुरक्षित निवारा आणि खाद्याची उपलब्धता होते, ज्यामुळे त्यांचे स्थलांतर होत नाही.

याबाबत जिल्हाधिकारी आणि वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेऊन दीर्घकालीन आणि कठोर कृती योजना आखावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वाढत्या बिबट्यांच्या संख्येमुळे निर्माण झालेला हा धोका संपूर्ण मानवजातीसाठी चिंतेचा विषय बनला असून, यावर प्रशासनाने युद्धपातळीवर लक्ष देणे गरजेचे आहे. जुन्नर तालुका आणि परिसरात नागरिकांकडून आता प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



### तातडीच्या उपाययोजनांची मागणी

» बिबट्यांची नसबंदी : बिबट्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी नसबंदीचा प्रस्ताव मंत्रालयीन पातळीवर अंतिम टप्प्यात आहे. प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही करावी.
» स्थलांतरण: ज्या बिबट्यांनी मानवी वस्तीत वारंवार हल्ले केले आहेत, त्यांना पकडून सुरक्षित नैसर्गिक अधिवासात स्थलांतरित करावे.
» प्रभावी गस्त आणि जनजागृती: वनविभागाने रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी आणि बिबट्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती करावी.
» क्षतिपूर्ती आणि वैद्यकीय मदत: बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या किंवा मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना तात्काळ आणि पुरेशी आर्थिक मदत, वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्यावी.

### बिबट्यांच्या हल्ल्यांची वाढती मालिका

» अलीकडच्या काळात बिबट्यांनी केलेल्या हल्ल्यांमुळे अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. रात्रीच्या वेळी घरात किंवा घराबाहेर असणाऱ्या नागरिकांवर बिबट्या अचानक हल्ला करत असल्याच्या अनेक घटना नोंदवल्या गेल्या आहेत. यामुळे शेतीची कामे, रात्रीचा प्रवास आणि लहान मुलांचे घराबाहेर खेळणेही धोक्याचे झाले आहे.

### नागरिकांमध्ये भीती आणि संताप

» बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे आणि संतापाचे वातावरण आहे. अनेकदा बिबट्याला पकडण्यासाठी लावलेले पिंजरे पुरेसे नसल्याचे किंवा वनविभागाच्या उपाययोजना तात्पुरत्या ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या वाढत्या संख्येवर नियंत्रण न ठेवल्यास भविष्यात बिबट्या-मानव संघर्ष अधिक उग्र रूप धारण करेल आणि मानवी वस्तीचे मोठे नुकसान होईल, अशी भीती लोक व्यक्त करत आहेत.

# आंबेगावातील 10 हजार शेतकरी होणार थकबाकीदार? पीककर्ज परतफेडीस मुदतवाढीची मागणी

## आंबेगाव तालुक्यात सुमारे 13 हजार शेतकऱ्यांना 30 सप्टेंबरअखेर पीककर्ज भरावे लागणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्यातील सुमारे 10 हजार शेतकरी होणार थकबाकीदार होण्याच्या उंबरठ्यावर आहे. त्यामुळे पीककर्ज परतफेडीस मुदतवाढ देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

आंबेगाव तालुक्यात सुमारे 13 हजार शेतकऱ्यांना 30 सप्टेंबरअखेर पीककर्ज भरावे लागणार आहे. अन्यथा, सर्व शेतकरी थकबाकीदार होणार आहेत. थकीत पीककर्जावर 11 टक्के व्याज अधिक 1 टक्का दंड भरावा लागणार आहे.

मात्र, खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकऱ्याच्या हातात पैसा नाही. परिणामी, वेळेत शेतकरी पीककर्ज भरू शकत नाही. त्यामुळे पीककर्ज भरण्यास तीन महिने मुदतवाढ द्यावी, अशी मागणी किसान काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब ऊर्फ तानाजी इंदोरे यांनी केली आहे.

मागील पाच महिने पडत असलेल्या पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक पिके पाण्यात गेली आहेत. बराकीत साठवलेल्या कांद्याला बाजारभाव नाही. बदलत्या वातावरणामुळे कांदा सडला आहे. तर टोमॅटो पिकावर मोठ्या प्रमाणात बुरशी रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. तसचे सततच्या पावसामुळे टोमॅटो सडले आहेत.

सातगाव पठार भागातील काढणीला आलेल्या बटाट्याच्या शेतात पाणी साचले आहे. तर उशिरा पेरणी झालेले सोयाबीन पावसाने काही प्रमाणात कुजले आहे. दुबार पेरणी केलेल्या सोयाबीनला अपेक्षित उत्पादन येणार नाही. त्यामुळे खरीप हंगामातून शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला आहे. कांद्याने उत्तर पुणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. त्यातच रब्बी हंगामासाठी 59 सहकारी संस्थामधून सुमारे 13 हजार शेतकऱ्यांनी 84 कोटी रुपयांचे पीककर्ज घेतले आहेत. त्यातून ऊस, कांदा, बटाटा, टोमॅटो आदी पिकांची लागवड केली आहे. या पीककर्ज परतफेडीची सहा महिने मुदत होती. हे कर्ज मुदतीत फेडल्यास शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराचा लाभ होणार होता.



### कर्जमाफीची मागणी

» यंदा शेतकऱ्याचे आर्थिक गणित बिघडल्याने जगायची कशी याची चिंता पडली आहे. त्यातच पीककर्जाचे पैसे कसे भरावयाचे ही समस्या भेडसावत आहे. थकबाकीदार शेतकऱ्याला इतर वित्तीय संस्था कर्ज देणार नाहीत. त्याचबरोबर थकित कर्ज त्यावर येणारे नोटीस व इतर खर्च करावा लागणार आहे. परिणामी, शेतकऱ्याला सावकाराच्या दारात उभे राहण्याशिवाय पर्याय उरणार नाही. हे टाळण्यासाठी कर्जमाफीची मागणीही शेतकरी करू लागले आहेत.